# विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर

# ग्रंथ दिंडी

# 8/6/2018

## उदघाटक: प्राचार्य अभयकुमार साळुंखे

(कार्याध्यक्ष श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,कोल्हापूर)

Jr. College Recog. No. H.S.C./1074/R-1/DT : 8-8-1976
Jr. College Code No. 23-09-002

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार''
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Estd : June 1964

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

2130, 'E' Tarabai Park, Kolhapur, Dist, Kolhapur-416 003
Affiliated to Shivaji University, Kolhapur (M.S.)
NAAC Reaccredited : "A" (CGPA 3.24) on 19-01-16 (3rd Cycle)
College with Potential for Excellence
"Star College" by D. B. T. Govt. of India

GOLDEN JUBILEE YEAR 2013-14

NIRF Ranking - 1st in Shivaji University, 5th in Maharashtra and 58th in India

Ph. : 0231-2658612, 2658840 Fax : 0231-2658840 Resi.: 0231-2653962 Website : www.vivekanandcollege.org E-mail : info@vivekanandcollege.org

| Founder | President | Chairman | Secretary | Principal |
|---|---|---|---|---|
| Dr. Bapuji Salunkhe<br>D. Lit. | Hon. Chandrakant Dada Patil<br>Minister of Revenue, Relief & Rehabilitation, Public works, Govt. of Maharashtra | Prin. Abhaykumar Salunkhe<br>M.A | Prin. Mrs. Shubhangi Gavade<br>M.Sc., B.Ed | Dr. S. Y. Hongekar<br>M.A., M.Ed., P.G.D.T.E., M.Phil., Ph.D. |


Ref No. VCK/ 456/18-19

Date : 2.6.2018

प्रति,
मा. अध्यक्ष,
पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील ट्रस्ट
हनुमान मंदिर, कसबा बावडा,
कोल्हापूर.

विषय : **ग्रंथ दिंडी साठी पालखी मिळणेबाबत ....**
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्ष उद्‌घाटन समारंभ

महोदय,

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार" या ध्येयाने प्रेरित होऊन शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना १९५५ साली केली. आज श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील एक अग्रमानांकित शिक्षण संस्था आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ हे वर्ष श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक, संस्थापक व संवर्धक शिक्षणमहर्षी गो. ज्ञा. उर्फ डॉ. बापूजी साळुंखे यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे होत असून त्यानिमित्ताने त्यांच्या शैक्षणिक विचारांचा व कार्याचा जागर करणेचे योजिले आहे. या जन्मशताब्दी वर्ष समारंभ निमित्त शनिवार दि. ९ जून २०१८ रोजी सकाळी ८.०० वाजता ग्रंथदिंडीचे आयोजन केले आहे.

तरी यासाठी आम्हांस आपल्या हनुमान मंदिरातील पालखी शुक्रवार दि. ८ जून २०१८ रोजी देऊन सहकार्य करावे ही विनंती. दि. १० जून २०१८ रोजी सदरची पालखी सुस्थितीत परत करीत आहोत.

सोबत निमंत्रण पत्रिका जोडली आहे.

कळावे,

आपला विश्वासू ,

(डॉ. एस. वाय. होनगेकर)
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज,
कोल्हापूर.


शिक्षण महर्षी
|| राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ ||



शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथदिंडीचे आयोजन



KOLHAPUR





श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्यावतीने आयोजित डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्ष उद्घाटनप्रसंगी बोलताना शिक्षणमंत्री विनोद तावडे. डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना डावीकडून प्राचार्या शुभांगी गावडे, एस. वाय. होनगेकर, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, नामदेव कांबळे, टी. ए. गवळी, शरदचंद्र साळुंखे.

# बापूजींमुळे शिक्षणगंगा

## डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी सोहळ्यात शिक्षणमंत्री तावडे यांचे गौरवोद्गार

**म. टा. प्रतिनिधी,** कोल्हापूर

'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्य कौतुकास्पद असून शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांनी उभा केलेल्या शिक्षण संस्थामुळे ग्रामीण भागातील बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचू शकली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला बापूजींमुळे कार्यातून शिक्षणाची जोड मिळाली आहे,' असे गौरवोद्गार राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी काढले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवाच्या प्रारंभप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष, पालकमंत्री चंद्रकात पाटील होते. माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील, महापौर शोभा बोंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तावडे म्हणाले, 'देशाचे भविष्य निर्माण करण्याची संधी शिक्षणात आहे. गेल्या चार वर्षांत शिक्षण पद्धतीत अनेक बदल करण्याचा प्रयत्न केला आहे. विवेकानंद, रयतसारख्या शिक्षण संस्था चांगले काम करत असून त्यांना शासकीय पातळीवर सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल. विवेकानंद शिक्षण संस्थेचा आवाका आणि गुणवत्ता पाहता त्यांनी स्वायत्त संस्था म्हणून मान्यता मिळवण्यासाठी प्रयत्न करावेत, याकामी सरकारच्या माध्यामातून आम्ही त्यांना सहकार्य करू. यापुढे चॉईसबेस क्रेडिट शिक्षणपद्धतीवर भर दिला जाणार आहे. कोल्हापुरात छत्रपती शाहू महाराजांनी रुजवलेल्या शिक्षणाची परंपरा स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमातून यशस्वीरीत्या पुढे नेली जात आहे.'

पालकमंत्री पाटील म्हणाले, 'शिक्षणक्षेत्र अधिकाधिक सक्षम होण्यासाठी चारित्र्यसंपन्न माणूस शिक्षण व्यवस्थेतून तयार व्हायला पाहिजे. डॉ. बापूजींनी ग्रामीण भागात शिक्षण पोहचवले आहे, त्यामुळे तळागाळातील मुली शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आल्या. या संस्थेचे अध्यक्षपद भूषवताना हा वटवृक्ष अधिक समर्थ करू.'

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. जन्मशताब्दी वर्ष भूमिका व नियोजन प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी आमदार अमल महाडिक, कुलगुरू देवानंद शिंदे, प्रवर अधीक्षक डाकघर आय. डी. पाटील, संस्था उपाध्यक्ष संपतराव जेधे, प्राचार्य युवराज भोसले, प्राचार्य धनराज भोसले, प्राचार्य आर. आर. पाटील, जी. पी. पाटील, शाहीर कुंतीनाथ करके, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते. प्राचार्या शुभांगी गावडे यांनी आभार मानले

यावेळी जन्मशताब्दी वर्षानिमित्त लोगो तसेच डॉ. बापूजी यांच्या स्मृती कायम राहाव्यात या उद्देश्याने टपाल पाकीट अनावरण व जन्मशताब्दी दिनदर्शिका व नियोजन पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

### शहरात भव्य मिरवणूक

डॉ. बापूजी साळुंखे यांच्या कार्यकर्तुत्वाची ओळख करून देणारी अभूतपूर्व मिरवणूक काढण्यात आली. दसरा चौकातून छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन मिरवणुकीची सुरुवात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे व संस्था सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांच्या उपस्थिती करण्यात आली. मिरवणूक दसरा चौक,व्हिनस कॉर्नर, दाभोळकर कॉर्नर मार्गे विवेकानंद शिक्षण संस्थेच्या परिसरात काढण्यात आली. तसेच डॉ. बापूजींचे जन्मगाव रामापूर पाटण येथून निघालेली ज्ञानज्योत सातारा कराडमार्गे कोल्हापूरात आणण्यात आली. ज्ञानज्योतीचे कावळा नाका येथे स्वागत करण्यात आले. त्यानंतर शिवाजी विद्यापीठातील बापूजींच्या पुतळ्यास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी अभिवादन केले. मिरवणूक सोहळ्यात डॉ. बापूजींच्या आठवणींना उजाळा देणारे चित्ररथ, देखावे, त्यांच्या कार्याचा वेध घेणारे फलक, पारंपारिक वेशभूषा, लेझीम, झांजपथक, एन.सी.सी.छात्रांची बुलेट रॅली, ग्रंथदिंडीचा समावेश होता. यावेळी बापूजींच्या शैक्षणिक कार्यासंबंधी घोषणा देण्यात आल्या. मिरवणुकीत विवेकानंद कॉलेज, न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल, डॉ. बापूजी साळुंखे इंजिनीअरिंग कॉलेज, सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेज, डॉ बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ हॉटिल मॅनेजमेंट, राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूलचे विद्यार्थीसर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी सहभागी झाले होते.